क्र.का.१४/न्या.प्र.क्र. २४२५/२००४/१०५
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,पुणे १.
दिनांक :- १३/१२/२००८.

**विषय :- घटस्फोटाचे दस्तऐवजाची नोंदणी न करण्याबाबत.**
**मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील जनहित याचिका**
**क्र. २४१५/२००४.**
**(मजलीस मंच विरुध्द महाराष्ट्र शासन)**

**परिपत्रक :-**

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, आपसंमतीच्या घटस्फोटाचे दस्तऐवज आपसांत तयार करुन त्यांची नोंदणी केली जाते. याबाबतीत नुकतेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील जनहित याचिका क्र २४२५/२००४ ( मजलीस मंच विरुध्द महाराष्ट्र शासन) यामध्ये दिलेल्या आदेशान्वये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, आपसंमतीचा घटस्फोट जर कौटुंबिक न्यायालयाने हुकूमात काढलेला नसेल तर तो बेकायदेशीर आहे. त्याचप्रमाणे उक्त कौटुंबिक न्यायालयाव्यतिरिक्त इतर सर्व घटस्फोटाचे दस्तऐवज, इ. बेकायदेशीर असतात.

दुय्यम निबंधक यांना निर्देश देण्यात येतात की, कौटुंबिक न्यायालयाने हुकूमातील केलेला आपसंमतीचा घटस्फोट वगळता, घटस्फोटाबाबतचे इतर कोणतेही दस्तऐवज जसे विवाह विच्छेदन, फारकत, सोडचिठ्ठी इत्यादींची नोंदणी करण्यात येवू नये. याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

का.प्र.मा.नों.म.नि.,
यांचे सहीची असे.

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे करिता.

प्रति,
सर्व दुय्यम निबंधक यांना....
प्रत :-
१) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक.
२) विवाह अधिकारी.
३) सर्व सह जिल्हा निबंधक.
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

Court Matter--1/Deshpande/091204